महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ,
पुणे विभागीय मंडळ,पुणे ४११००५

यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेले परिपत्रक क्रमांक/पुविमं/लेखा-१-२/नोंदणीशुल्क/सन २०२०-२१/१३७२ दिनांक ०२/०७/२०२० रद्द समजावे.

सुधारित परिपत्रक -

परिपत्रक क्र.पुविमं/लेखा-१-२/नोंदणी शुल्क/सन २०२०-२१/1534 पुणे दिनांक 23/07/२०२०

विषय- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठीचे नोंदणी शुल्क व शिक्षणसंक्रमण शुल्क भरणेबाबत . . .

पुणे विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मंडळ मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क खालील नमूद केलेल्या दराने इ.१० वी/इ.१२ वी च्या नियमित विदयार्थी संख्येप्रमाणे दिनांक १० ऑगस्ट २०२० पूर्वी या विभागीय मंडळाकडे बँक ऑफ इंडिया मध्ये दोन स्वतंत्र चलनाव्दारे जमा करण्यात यावे.

**माध्यमिक व उच्च माध्यमिक साठी नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क प्रचलित पदधतीनुसार स्वतंत्र चलनाव्दारे बँक ऑफ इंडियाच्या खात्यावर जमा करावे.**

HSC साठी | S.S.C साठी

बँक ऑफ इंडिया ACCOUNT NO. -051710110005058 IFSC BKID0000517 | -051710110005059 IFSC BKID0000517

*नोंदणी शुल्क तक्ता*

| दिनांक | तपशील | नोंदणी शुल्क | |
|---|---|---|---|
| | | इयत्ता १० वी माध्यमिक शाळा | इयत्ता १२ वी कनिष्ठ महाविद्यालय |
| दि.१० ऑगस्ट २०२०पर्यंत | १ ते १०० विदयार्थ्यांकरिता | रुपये १०००/- | रुपये १०००/- |
| | त्यापुढील प्रत्येक १०० विदयार्थ्यांसाठी | रुपये २००/- | रुपये ४००/- |
| दि.११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२० | दंडात्मक शुल्क | रुपये २००/- | रुपये २००/- |
| दि.०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२० | दंडात्मक शुल्क | रुपये ३००/- | रुपये ३००/- |
| दि.१ ऑक्टोबर नंतर नियमित विदयार्थ्यांची आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखेपर्यंत | दंडात्मक शुल्क | रुपये ५००/- | रुपये ५००/- |

**विशेष सूचना-**

१. दि.१० ऑगस्ट २०२० नंतर नोंदणी शुल्क भरल्यास वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे दंडाच्या रकमेसह नोंदणी शुल्क भरणे आवश्यक राहील.

२. चलनातील सर्व माहिती परिपुर्ण भरुन चलनावर विदयार्थी संख्येची नोंद **करणे आवश्यक आहे. तसेच पत्रामध्ये विदयार्थी संख्या** नोंदवावी.

३. इ.१० वी १२ वी साठी फेब्रु/मार्च २०२१ च्या परीक्षेकरिता प्राप्त होणा-या नोंदणी **शुल्काची पडताळणी ही, आपण मंडळाकडे सादर** केलेल्या नियमित विदयार्थ्यांच्या आवेदनपत्रांच्या संख्येवरुन करण्यात येणार आहे. तेव्हा नोंदणी शुल्क भरतांना सदर बाबींची मुख्याध्यापक/प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

४.नोंदणी शुल्क व शिक्षणसंक्रमण शुल्क मंडळाकडे पाठवितांना सोबत जोडलेल्या नमुन्यातील प्रपत्रावर माध्यमिक शाळा/क.म.सांकेतिक क्रमांक, इ.१० वी/१२ वी नियमित विदयार्थी संख्या, चलन क्रमांक, दिनांक, एकुण रक्कम व बँकेचे नाव इ.बाबी नमूद कराव्यात.

५.अपरिहार्य कारणास्तव चलनाव्दारे नोंदणी शुल्क जमा करता न आल्यास राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट किंवा मंडळ कार्यालयात रोखीने शुल्क भरण्यात यावे.

**६. सर्व मान्यताप्राप्त शाळा/क. महाविद्यालय तसेच ज्या शाळांना माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग संलग्न असतील अशा माध्यमिक शाळा/कनिष्ठ महा. इ.१० वी/१२ वी साठी स्वतंत्र रु.५००/- (२ अंकाचे ) शिक्षणसंक्रमण शुल्क भरणे अनिवार्य आहे.**

***शिक्षणसंक्रमणाबाबतचे सुधारित परिपत्रक तसेच याबाबत राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.**

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे नोंदणी शुल्क व शिक्षणसंक्रमण शुल्काचे चलन/डी.डी. दिनांक **१० ऑगस्ट २०२०** रोजी वा तत्पुर्वी काढलेला असावा व सदरचे चलन/डीडी दि. **१० ऑगस्ट २०२०** पर्यंत मंडळ कार्यालयात जमा करावेत. सदर दिनांकानंतरचे चलन व माहितीचा तक्ता दंडात्मक शुल्कासह मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावा. अन्यथा यासंदर्भात कोणतेही स्मरणपत्र/पत्रव्यवहार न करता मंडळ नियमावली नुसार कारवाई करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(प्रिया शिंदे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे

प्रत-

१. मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे

२. सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, पुणे/अहमदनगर/सोलापूर

३. विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग ४. शिक्षणाधिकारी माध्यमिक पुणे/नगर/सोलापूर